(3) 2018-19

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-2018 Special Issue – LXV**

**Chief Editor :** Dr. Dhanraj Dhangar
Assistant Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

**Executive Editors :**

- Mr. Ananta Kasture, Head, Dept. of Marathi, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Manik Wangikar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Vaman Sargar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani
- Mr. Santosh Bandgar, Asst. Professor, Smt. Meenalben Mehata College, Pachgani

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC) List No. 40705
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- Indian Citation Index (ICI)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October- 2018

SPECIAL ISSUE-LXV

## लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य

Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar
Assist. Professor,
Dept. of Marathi,
MGV's Arts and Commerce College, Yeola
Dist. Nashik (M.S.) India.

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 450/-

| | | |
|---|---|---|
| 51 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'स्त्री सुक्त' मधील आधुनिक स्त्रीवादाचे पैलू – प्रा.डॉ. चंद्रकांत कदम | 212 |
| 52 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यनिर्मितीची पार्श्वभूमी: प्रस्तावनेच्या अनुशंगाने –प्रा.लक्ष्मण साठे | 219 |
| 53 | बडोदे येथील अध्यक्षीय भा ाण: एक चिंतन – प्रा.डॉ. लक्ष्मण शिंट्टे | 226 |
| 54 | अंतर्मनातील संवादाचा समाजसेवी हुंकार: प्रशासननामा – प्रा. अनंता कस्तुरे | 228 |
| 55 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रशासकीय कार्य – प्रा. संजय भुतांबरे | 232 |
| 56 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रशासनवि ायक विवेचन – प्रा. राजेंद्र खंडाईत | 236 |
| 57 | प्रशासकीय अनुभवांचा संवेदनशील ठेवा – प्रा. बाळासो सुतार | 239 |
| 58 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे सामाजिक कार्य – प्रा. कुमार इंगळे | 251 |
| 59 | लक्ष्मीकांत देशमुख व स्त्री भुणहत्या विरोधी चळवळ – प्रा. प्रदीप चोपडे | 256 |
| 60 | लक्ष्मीकांत देशमुख व स्त्री भ्रूणहत्या विरोधी चळवळ – प्रा. ारद गायकवाड | 262 |
| 61 | 'सावित्रीच्या गर्भात मारलेल्या लेकी' : सामाजिक प्रश्न – प्रा. डॉ ार्मिला घाटगे | 265 |
| 62 | पाणी! पाणी!!: ग्रामीण वास्तवाचे जिवंत चित्रण –प्रा. अशोक मोरमारे | 269 |
| 63 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कथा लेखनातील सामाजिक जाणिवा: पाणी! पाणी!! कथासंग्रहा संदर्भात –प्रा.डॉ शिवाजीराव देशमुख | 276 |
| 64 | लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'सलामी' कादंबरीतून चित्रित केलेली मुस्लिम मानसिकता –प्रा.राजा जगताप | 280 |
| 65 | लक्ष्मीकांत देशमुख यांचे कथात्मक साहित्य – प्रा. डॉ. सागर लटके | 284 |
| 66 | 'अखेरची रात्र' एक सरस ाोकांतिका --प्रा. स्मिता कालभू ाण | 287 |
| 67 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या पाणी! पाणी!! या कथासंग्रहातील पाण्याचे 'दुर्भिक्ष' – प्रा. संदिप निर्मळ | 290 |
| 68 | 'ऑक्टोपस' मधील भ्रष्टाचाराचे चित्रण – प्रा. भारती कोळेकर | 293 |
| 69 | स्त्री तृ णेचा अनुबंध मांडणारा कथासंग्रह–मृगतृ णा – डॉ. रमेश शिंदे | 298 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 65 : लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October -2018

# 'ऑक्टोपस' मधील भ्रष्टाचाराचे चित्रण

भारती श्रीधर कोळेकर.

मराठी साहित्यामध्ये १९८० नंतरच्या कालखंडात मोजकेच पण निवडक विषयांवर ताकदीने लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये **लक्ष्मीकांत देशमुख** यांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्यांमध्ये वर्तमान समाजजीवन वास्तवदर्शीपणे चित्रित झाले आहे. समाजातील बालमजुरी, एड्सग्रस्त बालकांचे वाढते प्रमाण, नक्षली जीवनाचे अंतरंग, जातीय राजकारण, दहशतवात, पाणी प्रश्न, काश्मीर प्रश्न, मराठवाडा मुक्तीसंग्राम, उपभोगवादी वृत्ती, आत्मकेंद्रितता, राजकारण व प्रशासनातील भ्रष्टाचार अशा अनेक समकालीन व दाहक प्रश्नांना मुखर करण्याचे कार्य लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून केले आहे.

भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी पदावर काम करत असताना प्रशासकीय यंत्रणेला, विशेषकरुन ग्रामीणपासून जिल्हास्तरापर्यंत कामकरणाऱ्या कर्मचारी वर्ग व छोट्या–मोठ्या अधिकारी वर्गाला स्वच्छ व निस्पृहपणे राहणे किती अवघड आहे. तसेच भारतीय समाजजीवनाबरोबरच प्रशासकीय क्षेत्र व राजकारणात भ्रष्टाचाराची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहे याचा त्यांना विदारक अनुभव आहे. वर्तमानजीवनात नैतिकतेने काम करणाऱ्या लोकांपेक्षा भ्रष्ट लोकच अधिक आहेत. व त्यांच्यापर्यंत कायदाही पोहचू शकत नाही. याउलट नैतिकतेने, आदर्शवादी व ध्येयवादाने काम करणाऱ्या अधिकाऱ्याला – भ्रष्टाचाराला नियंत्रित करणाऱ्या प्रशासकांना अपमानास्पद वागविणे, पदावनती करणे, बदली करणे, बदनाम करणे, कामात अडथळे आणणे अशा पध्दतीने ही भ्रष्ट व्यवस्था त्यांना मेटाकुटीस आणते. त्यामुळे अगदी अल्पसंख्य असलेला पण नैतिकतेने चालणारा कर्मचारी वर्ग वा अधिकारी वर्गाला वैफल्यग्रस्त होणे अथवा असह्य झालंच तर या भ्रष्ट यंत्रणेशी तडजोड करावी लागते. व अशा भ्रष्ट व्यवस्थेत नितिमत्ता जपून काम करणारे मात्र अगदीच दुर्लभ. अशाच भ्रष्ट परिस्थितीत ध्येयवादी, आदर्शवत व नैतिकतेने जगणाऱ्या माणसांचे (भगवान काकडे व आनंद पाटील), अंतिमत: त्यांच्या पराभूतपणाचे जीवनदर्शन घडविणारी 'ऑक्टोपस' ही कादंबरी.

**ऑक्टोपसची टेंटॅकल्स ('ऑक्येपस' मधील भ्रष्टाचार)**

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या प्रशासकीय सेवेतील अनुभवविश्वातून साकारलेली कादंबरी म्हणजे 'ऑक्टोपस'. 'ऑक्टोपस' हे भ्रष्टाचाराचे प्रतिक म्हणून आले आहे. आक्टोपसची टेंटॅकल्स ही जशी एखादं भक्ष्य मिळताच त्याला करकचून विळखा घालून जखडतात. तसं भारतीय समाजजीवनाला भक्ष्यस्थानी ठेवून भ्रष्टाचाररुपी ऑक्टोपसच्या टेंटॅकल्सनी जखडून ठेवलं आहे. या विळख्यातून सुटणं हा तर मोठा प्रश्न आहे. किंबहुना असे सुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या, नितिमत्तेने व आदर्शवत प्रशासन करणाऱ्या अल्पसंख्य व्यक्तींना ही भ्रष्टाचारी व्यवस्था एकतर वैफल्यग्रस्त बनवते अन्यथा निरुपायानं त्या यंत्रणेशी तडजोड करण्यास भाग पाडते. जर तडजोड करण्याची वेळ आलीच तर ते त्याचाच भाग बनतात, एक टेंटॅकल म्हणून.

**आनंद पाटील** हा ध्येयवादी व मध्यमवर्गीय तरुण प्रांताधिकारी ते कलेक्टर पदापर्यंत स्वकर्तृत्वावर पोहोचलेला. आदर्श कलेक्टर आनंद पाटीलला आदर्श मानणाऱ्या भगवान काकडेला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने शेतकऱ्याकडून फेरफार प्रकरणी सापळा रचून ४००/– रु. ची लाच घेताना अटक करुन निलंबित केलंजातं. खरं तर यावेळी आनंद स्वत:च्या अधिकाराखाली काकडेचा निलंबनाचा आदेश रद्द करु शकत होता. पण आपल्या स्वच्छ प्रतिमेच्या अतिसंवेदनशीलतेमुळे काकडेला निलंबित करण्याचा आदेश देतो.

ISSN : 2348-7143
October -2018

आदर्श कलेक्टर आनंद व व्यवहारी पोलीस अधिक्षक मराठे यांच्यामध्ये कॉलेजकन्येचा पोलिस स्टेशनमध्ये विनयभंग करणाऱ्या पोलीस निरीक्षक गायतोंडेची केस उभी राहते तेव्हा गायतोंडेला निलंबित करुन चौकशी करणे योग्य होते. पण 'मुंबई पोलिस कायद्याप्रमाणे आनंदला जिल्हाधिकारी म्हणून पोलिस निरिक्षकाला बदलता येतं पण त्याला तो अधिकार वापरुन दोन जिल्हाप्रमुखांचे संबंध बिघडवायचे नव्हते. आधीच महसूल व पोलीस खात्यात खास करुन आय.ए.एस. व आय.पी.एस. यांच्यात वर्चस्वाचा सुप्त संघर्ष होता.'[१] व आनंदची ही कृती त्यामुळे स्फोटक ठरली असती म्हणून तो डी.आय.जी.ना गायतोंडेला निलंबित करण्याऐवजी तात्काळ बदली करायचं आश्वासन देतो.

दीपक पाध्ये सारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यावर लाचलुचपत खात्याच्या आदेशानुसार चौकशी न करता त्याला स्वत:च्या प्रतिमेसाठी निलंबित करतो. सिलिंग जमीन कायद्याअंतर्गत पालकमंत्र्यांच्या मेहुण्याची जमीन अतिरिक्त ठरली होती. त्यामुळे तिच्या वाटपाचे आदेश कलेक्टरांनी तहसिलदारांना तातडीने दिले होते त्या आदेशानुसार तहसिलदारांनी तसा लेखी आदेश भगवानला दिला होता. कारण स्वत: जमीन वाटप केली तर ते प्रकरण तलाठ्यावर शेकणार होतं. परिणामी आदेशानुसार भगवानने जमिनीचे वाटप केल्यामुळे मंत्री, आनंदला भगवान काकडेची बदली करण्याचे आदेश देतो. पण भगवानने जमीन वाटप हे सरकारी धोरणांची अंमलबजावणी असल्याने आनंद भगवानच्या बदलीला नकार देतो. पण या नकाराची किंमत मात्र आनंदला पदावनतीच्या अपमानास्पद स्वरुपात मोजावी लागते. कलेक्टर पदावरुन कमी होऊन अमरावती जिल्ह्यात आदिवासी विभागात प्रकल्प अधिकारी म्हणून आनंदची नियुक्ती होते. ही बदली केवळ आणि केवळ भगवानच्या प्रामाणिकपणाचा निर्वाळा दिल्यामुळे. त्याच्या या बदलीचा दूरगामी परिणाम त्याच्या कुटुंबावर, मुलांच्या शिक्षणावर होणार असल्याने तो पत्नी–मित्राच्या सांगण्यावरुन नैतिकता सोडून तडजोड करतो. व त्याची 'ही तडजोड हा भ्रष्टाचाराचाच एक भाग मी समजतो.... केवळ पैशाचंच करप्शन नसतं – पोजिशनचं – पॉवरचंही असतं असे कबुल करतो.'[२] मूळ आदर्शवादी असलेला आनंद हा काकडे, गायतोंडे, पाध्ये प्रकरणाबाबतीत काळाच्या ओघात परिस्थितीशरण होऊन भ्रष्टाचाराचा–ऑक्टोपसचा एक भाग बनतो.

**भगवान काकडे** हा कलेक्टर आनंदला आदर्श मानणारा येरमाळ्याचा तलाठी. सामाजिक वनीकरण, कुटुंबकल्याण व अल्पबचतीचे खाते समर्थपणे पेलणारा अव्वल तलाठी. त्याला सत्ताधारी राजकारण्यांची प्रचंड चीड होती. सध्या सत्ता हेच साध्य मानणाऱ्या व लोकहितापेक्षा लोकरंजनाला महत्व देणाऱ्या राजकारण्यांमुळे त्यांची विश्वासार्हता कमी झाली आहे. म्हणूनच नोकरशाहीबरोबर त्याचे घट्ट नाते होते व 'अशाच एका भ्रष्ट पुढाऱ्यामुळे भगवान खोट्या भ्रष्टाचाराच्या केसमध्ये ट्रॅप झाला होता. तेव्हा त्याने त्यांच्याशी तडजोड करुन बेछूट पैसा खाल्ला, कमावला. त्या काळात तो कधीच पकडला गेला नाही कारण अँटिकरप्शनच्या लोकांनाही तो हप्ता द्यायचा. प्रसंगी साग्रसंगीत सरबराई करायचा.'[३] त्यामुळे त्यावेळी तो राजकारण्यांचा आवडता व विश्वासू कर्मचारी बनला होता. ही सरबराई व डाकबंगल्यांचा बंदोबस्त म्हणजे महसूल खात्याला लागलेला महाभयंकर रोग. जेव्हा जेव्हा मंत्री, वरिष्ठ अधिकारी येतात तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांची माणसेही असतात. पण ही बहुधा राहण्याचे, खाण्यापिण्याचे पैसे देत नाहीत. तेव्हा हा सर्व खर्च तलाठी, गिरदारवरांनाच करावा लागतो. त्यामुळे ते भ्रष्ट बनलेले असतात. अशा तलाठ्यांवरील शिक्कामोर्तबाने काकडेविरुध्द खोटी साक्ष दिली जाते व त्याची बदली केली जाते.

प्रशासकीय सेवेत भ्रष्टाचार इतका मुरला आहे की प्रसंगी आपल्या घरची कामे करतानाही एखादा पैसे घेण्यास संकोच करत नाही. **करमरकर** हा सिडकोत प्रशासक. त्याचा बाप कट्टर गांधीवादी. त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या सवलती नाकारल्या पण त्यांचाच मुलगा असलेला करमरकर खूपच करप्ट आहे हे सांगताना देशपांडे म्हणतात, 'हा लेकाचा आपल्या बायकोचं कामदेखील पैसे घेतल्याखेरीज करणार नाही. एवढा तत्त्वाला पक्का आहे!'[४]

**भागीरथी** ही भगवानची पत्नी. तिचे तिच्या **हेडकॉन्स्टेबल वडिलांकडून** लहानपणापासून लाड झालेले. किंबहुना मुलीच्या पायगुणामुळे त्याला हे पद मिळाले असे त्याला वाटते. तो ज्या आऊटपोस्टचा इनचार्ज होता त्या हद्दीत भरपूर हातभट्ट्या होत्या. त्याचा सर्व मिळकतीचा स्रोत म्हणजे बेकायदेशीर हातभट्टी व चोरटी वृक्षतोड होय. याच्या माध्यमातून तो पैसा खूप मिळवतो. घरात तर अक्षरश: पैशाचा पाऊस होता. त्याच्या कृत्यामुळे त्याला दोनदा सस्पेंडही केले जाते व पुन्हा सेवेत घेतले जाते. इतकेच नव्हे तर तो प्रत्येकवेळेस निर्दोष सुटतो, याचे कारण म्हणजे त्याच्याजवळ असलेला पैसा व वरपर्यंत पोहोचलेले हात. एकदा तर त्याची लातूरला रेल्वेपोलिस इन्स्पेक्टर म्हणून झालेली बदली हणमंत खंदाडेच्या मदतीने त्याने रद्द करवून आणली होती.

**हणमंत खंदाडे** हा तर भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारा, भागीरथीच्या बापाचा मित्र व भगवानला ट्रॅप करुन पकडून देणारा. जेव्हा भगवानने खंदाडेवर शिक्षणकर व मालगुजारी थकबाकीची मागणी केली, तेव्हा खंदाडेचा एक फेरफार प्रलंबित होता व त्याला तो मंजुर करुन हवा होता. कारण या मंजूरीनं त्याला त्याच्या सैन्यातील भावाची जमीन मिळणार होती. पण भगवानमुळे त्याचा हा जमिनीवरील हक्क संपुष्टात आला होता. त्यामुळे त्याचा सूड म्हणून तो खोट्या केसमध्ये भगवानला ट्रॅप करतो तसेच पैसे घेऊन भागीरथीच्या वडीलांची बदली रद्द करतो.पण भगवानवर सूड उगवल्यामूळे सस्पेंड केल्यामुळे भगवानचे आयुष्य मात्र उध्वस्त होते. भागीरथी बरोबर घटस्फोट होऊन ती खंदाडे बरोबरच दुसरे घर करुन त्याची रखेल म्हणून राहते व छोट्या आंदूला आजीकडे रहावे लागते.खंदाडेमुळेच भगवानच्या जीवनाची अशी वाताहत होते. याला ट्रॅप करण्यामध्ये रुक्मीचा मावसभाऊ **शहाजी**चाही हात असतो. कारण भगवानच्या आईने हुंडयाची मागणी केल्यामुळे भगवान व रुक्मीचे लग्न मोडल्याचा सूड शहाजी खंदाडेच्या मदतीने उगवतो. भागीरथीचे वडील व खंदाडे स्वार्थ व पैशासाठी तर पाध्ये हा आमिषाला बळी

महसूल खातं असो वा पोलिस खातं. यांचं समीकरण भ्रष्टाचार व निलंबित होण्याशी जुळलेलं असतं. या खात्यांविषयी सतत – 'महसूल खातं म्हणजे भ्रष्टाचाराची 'गंगोत्री', 'तलाठी गिरदावर मंडळी तर बोलूच नका!', 'भ्रष्टाचार व निलंबित होणं हे महसूल व पोलिस खात्यात तर नवीन नाही.'५ या अनुषंगाने चर्चा होत असते.

याच खात्यातला **दीपक पाध्ये** हा कळंबचा प्रामाणिक तलाठी स्वकर्तृत्वाने, पदोन्नतीने तहसिलदार पदावर पोहोचलेला. याच्याकडे जवाहर सहकारी नागरी बँकेतील चौकशीची केस आली होती. या बँकेत खातेदारांनी ठेवलेल्या ठेवीच्या रक्कमेतून नव्वद टक्के रक्कम संचालक मंडळाने कर्ज म्हणून उचलली होती. विशेष म्हणजे ही संचालक मंडळी एकाच कुटुंबातील होती. व त्यांना खुद्द पालकमंत्र्यांचाच वरदहस्त लाभलेला होता. या प्रकरणी खातेदारांनी पोलिसात तक्रार दाखल केली तेव्हा बँकेचे अध्यक्ष व एजंट आसाराम माने

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 65 : लक्ष्मीकांत देशमुख यांचे समग्र साहित्य
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
October -2018

यांच्याविरुध्द पकड वॉरंट काढले जाते. त्यावेळी अध्यक्ष फरार होतो. आसारामला अटक होते पण त्यानंतर तीनच दिवसात आसारामचा संशयास्पद मृत्यू होतो. यावेळी इन्स्पेक्टर गायतोंडे मात्र खोट्या डॉक्टरी प्रमाणपत्राआधारे ही आत्महत्या असल्याचे जाहीर करतो. पण आसारामची पत्नी आसारामचा मृत्यू हा आत्महत्या नसून पोलिस मारहाण व अनन्वित छळ व अत्याचारामुळे झाल्याचे सांगते. तेव्हा मात्र सर्व जनमत गायतोंडे विरुध्द होते. कारण यापूर्वी गायतोंडेने एकदा क्षुल्लक कारणावरुन कॉलेज तरुणीला अटक करुन तिचा विनयभंग केल्याचे जनतेला परिचित होतेच. या प्रकरणाची चौकशी दीपक पाध्येकडे होती. तेव्हा चौकशी दरम्यान गायतोंडे व दीपक यांच्यात बार्शीला तमाशा थिएटरमध्ये झालेल्या पूर्वनियोजित बैठकीत 'दीपकनं त्याला चौकशीतून सोडवायचं व त्याबदली औरंगाबादला एक फ्लॅट गायतोंड्यानं त्याला घेऊन द्यायचा'[६] असा सौदा होतो. त्याची परिणती म्हणून आसाराम मानेचा मृत्यू हा पोलिस मारहाणीमुळे व छळामुळे झाला नसून त्याने आत्महत्या केली असावी असा निष्कर्ष सादर करुन शासनाकडून तो निर्णय मान्य करुन दप्तरबंद केला जातो. या प्रकरणातील पाध्ये, गायतोंडे, संचालक मंडळ ही ऑक्टोपसची टेंटॅकल्सच होत.

शासनाने १९६२ मध्ये वंशपरंपरागत असलेली पटवारी, कुलकर्णीपदे संपुष्टात आणली व गावपातळीवरील महसूल प्रशासनासाठी तलाठ्यांचे पद निर्माण केले. त्यावेळी जे जुने पटवारी, कुलकर्णी सक्षम होते त्यांना शासनाने तलाठी म्हणून नियुक्त केले. त्यापैकीच एक तलाठी म्हणजे **गोपाळ जोशी**. दोन–तीन मिटींगला गैरहजर राहिल्यामुळे तलसिलदारांनी जोशींच्या निलंबनाचे तात्पुरते आदेश मंजूर करण्यासाठी **उपजिल्हाधिकाऱ्यांकडे** पाठविले. पण हा आदेश तर मंजूर झाला नाहीच आणि जोशीला कामावरही हजर करुन घेतले जात नाही. अशावेळी आनंद कौशल्यपूर्वक ही केस सोडवतो व 'मागील तेरा वर्षांच्या पगारावर हक्क सांगणार नाही' असे प्रतिज्ञापत्र जोशीकडून लिहून घेऊन त्याला तलाठ्याच्या रिक्त पदावर नियुक्त करतो.

पण याच दरम्यान **बबनराव जगताप** हा जिल्हा परिषद सदस्य रिक्त असलेल्या पदावर आपल्या नातेवाईकाची नेमणूक तलाठी म्हणून व्हावी यासाठी प्रयत्न करत असतो. पण तो अपात्र असल्याने आनंदने त्याजागी जोशीची नेमणूक केल्यामुळे 'शेवटी जानव्यानं जानव्याची सोय पाहिली.'[७] अशी कडवी व जातीयवादी प्रतिक्रिया जगताप व्यक्त करतो. तसेच यामध्ये काहीतरी काळंबेरं असावं असंही सांगून भ्रष्टाचाराचा व पैसा खाल्याचा आरोपही आनंदवर करतो. या आरोपामुळे काकडेला सेवेत घेण्याबाबतच्या आदेशावर आनंद सही करत नाही. त्यामुळे भगवानला मात्र अडीच वर्ष निलंबित व्हावं लागलं त्यात त्याचे कुटुंबही उध्वस्त होते दोषी नसूनही केवळ एक सही न करण्याने भगवानच्या आयुष्य मात्र बरबाद होतं.

आजच्या व्यवहारी पिढीत तर भ्रष्टाचार इतका भिनला आहे की या पिढीला त्यांच्या व्यवहारीपणामुळे भ्रष्टाचार हा भ्रष्टाचार वाटत नाही. तर जगण्याचाच एक भाग व अपरिहार्यता वाटते. इतकेच नव्हे तर तो सद्यस्थितीत भूषणावहही वाटतो. म्हणून तर निशा म्हणते; 'समजा, नाही मेरिटमध्ये आले व नाही चांगले मार्क्स पडले, तरीही काही बिघडत नाही. माय पप्पा इज फिल्दी रिच! मला ते कुठल्याही कॉलेजमध्ये लाख–दोन लाख खर्चून पेमेंट सीट मॅनेजमेंट कोटयातून प्रवेश मिळवून देतील... त्यामुळे आय रिअली डोंट बॉदर!... ते ज्या खात्यात पोस्टवर आहेत तिथं चारी बाजूंनी दररोज घरी पैसा येतो. पप्पा तो दोन्ही हातांनी भरभरुन लुटतात.'[८] आणि आमच्या शिक्षणासाठी ते पाण्यासारखा पैसा खर्च करतात व करतील. असा विश्वासही व्यक्त करते. व्यवहारी जगात टिकण्यासाठी 'वाटेल ते' करण्याची तयारी व कुठलेही बंधन झुगारुन देण्याची इच्छा यातून **आनंद काकडे** त्याच्या आदर्शवादी पित्याचे – **भगवान काकडेचे** मतपरिवर्तन करतो. व एकेकाळी

करप्ट म्हणून बापाचा द्वेष करणारा आनंद आता पुन्हा सदाचाराची वाट चोखाळलेल्या बापाला निशाबद्दलचे आकर्षण व खाजगी कॉलेजमध्ये मेडिकलला प्रवेश घेणे यासाठी भ्रष्टाचारी बनण्यास स्वतःच प्रवृत्त करतो.[९]

प्रत्येक व्यक्तीचा, पिढीचा एक धर्म असतो. तसा काळाचाही एक युगधर्म असतो. तसा आजच्या काळाचा युगधर्म म्हणजे सत्ता व संपत्ती. हे सांगताना पोलिस इन्स्पेक्टर असलेल्या वडिलांबाबत निशा म्हणते, 'तलावाची राखणदारी करताना त्यातला एक थेंबही चाखायचा नाही, असे ते साधू महात्मा नाहीत! किंबहुना पोलिस खात्यात यायची त्यांची प्रेरणा पॉवर व मनी हीच होती. आजचा हा युगधर्म आहे. पॉवर व मनी हेच इप्सित आहे.'[१०] त्यामुळे पैसा हेच एकमेव मूल्य व भोग हाच एकमेव धर्म मानणारी माणसे म्हणून भागीरथी व खंदाडे कडे पाहता येते.

कार्यक्षेत्र कोणतेही असो प्रामाणिकपणाने काम करणाऱ्या माणसाच्या पदरी शेवटी मनस्ताप व नोकरीपासून परावृत्त होण्याची वेळ अथवा भिती वाट्याला येते. आजकाल प्रशासकीय क्षेत्राबाबतही टिपिकल मध्यमवर्गीयांचा दृष्टिकोन बदलला असल्याचे सांगताना आनंद म्हणतो, 'प्रशासन म्हणजे घाण – भ्रष्टाचाराची खाण! निर्बुध्द पुढाऱ्यांची ढवळाढवळ... हांजी हांजी करणारे व पुढाऱ्यांशी जुळवून घेणारेच यशस्वी ठरतात व बाकीचे प्रामाणिक अधिकारी खडयासारखे वेचून अडगळीत टाकले जातात.'[११]

तसेच राजकारणातही लोकांना आज ध्येयवाद व आदर्शवाद नको आहे. त्यांना फक्त त्यांची अडलेली कामे करणारा लोकप्रतिनिधी हवा आहे. राजकारणीही जणू काही 'आपल्याला पाहिजे तसा कारभार करण्यासाठीच जनतेने निवडून दिले आहे.' असा वृथा अभिमान बाळगणारी आहेत. तसेच 'निवडणूका ह्या तर फक्त पैशाचा व जाती–गट–धर्म यांच्या प्रभावाचा खेळ बनला आहे. राजकीय क्षेत्र असो वा प्रशासन. तेथील प्रत्येकाची बांधिलकी ही खरेतर कायद्याद्वारे प्रस्थापित समाजरचनेशी व त्याच्या हिताशी ... 'पण आम्ही अधिकारीही पैशाच्या, स्टेटसच्या मागे लागलो आहोत, म्हणूनच भ्रष्ट झालो आहोत!'[१२] असे आनंद म्हणतो.

प्रशासकीय खाते असो वा पोलिसखाते. त्यामध्ये दररोज लहानमोठे भ्रष्टाचार होतच असतात. त्याला इथली व्यवस्थाही कारणीभूत असते. तसेच देशात सर्वत्र खालच्या स्तरापासून वरपर्यंत भ्रष्टाचाराच्या ऑक्टोपसने घट्ट विळखा घातला आहे. त्याचे टेंटॅकल्स सर्वदूर पसरले आहेत. याबाबत माजी आमदार मोहितेसाहेब म्हणतात, ''भ्रष्टाचाराच्या संदर्भात तलाठी काय वा इतर कर्मचारी व अधिकारी पण काय, हे खरे तर तलावातले छोटे– फार छोटे मासे आहेत. मोठे मासे तर दिल्ली मुंबईला असतात!''[१३]

समाजातील ऑक्टोपसचा हा विळखा घट्ट बसण्यासाठी केवळ प्रशासकीय क्षेत्र अथवा पोलिसखातेच एकमेव कारणीभूत नसून त्याला समाजजीवनही कारणीभूत आहे. व याबरोबरच सर्वच क्षेत्रामध्ये मूल्यांची झालेली घसरण व अशा परिस्थितीत अशा समाजातून निर्माण होणारी नवी पिढीसुध्दा (निशा व आंदूसारखी) त्याला कारणीभूत असल्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे.

**भारती श्रीधर कोळेकर.**
**संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग**